आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ एप्रिल २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोरासायनिक उत्पादनांवरचं सीमाशुल्क ३० जूनपर्यंत रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- राज्यसभेत आज 'आंध्र प्रदेश पुनर्रचना सुधारणा विधेयक, २०२६' आवाजी मतदानानं मंजूर

- २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपये इतकी विक्रमी निर्यात

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स आणि सनराईजर्स हैद्राबाद यांच्यात सामना

**<><><><><>**

प्रमुख पेट्रोरासायनिक उत्पादनांवर ३० जूनपर्यंत संपूर्णपणे सीमाशुल्क माफ केलं जाणार आहे, असं सरकारनं आज जाहीर केलं. यामुळे प्लास्टिक, वस्त्रोद्योग, औषधनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांना दिलासा मिळणार आहे. देशातली तेल शुद्धीकरण केंद्रं पूर्ण क्षमतेनं कार्यरत असून पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी उत्पादन शुल्क कमी करण्यात आलं आहे. पुढच्या ६० दिवसांसाठी कच्च्या तेलाचा पुरवठा निश्चितपणे होणार आहे. इराणमधून सुमारे १२०० भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे आर्मेनिया आणि अझरबैजानमध्ये स्थलांतरित केल्याचं सरकारनं सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या शहरी भागात पीएनजी गॅसचा पुरवठा करण्याच्या कामाचा आढावा

घेण्यासाठी आज केंद्रीय गृहनिर्माण आणि शहर मंत्रालयाचे सचिव आणि पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाच्या सचिवांनी संयुक्तरित्या एक आढावा बैठक घेतली. पाईपद्वारे नैसर्गिक वायुचा पुरवठा करण्यासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली. शहरी भागात नैसर्गिक वायुच्या पाईपलाईन उभारण्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश यावेळी संबंधितांना देण्यात आले.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज शेवटचा दिवस होता. लोकसभेत आज 'केंद्रीय सशस्त्र पोलीस दल सामान्य प्रशासन विधेयक, २०२६ चर्चेसाठी आणि मंजुरीसाठी मांडण्यात आलं. राज्यसभेत हे विधेयक यापूर्वीच मंजूर झालं आहे. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी हे विधेयक मांडलं. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातले गट अ सर्वसाधारण कर्तव्य अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची भरती आणि सेवेच्या अटींशी संबंधित सर्वसाधारण नियमांचं नियमन करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे. चर्चेची सुरुवात करताना, काँग्रेसचे हरीशचंद्र मीना यांनी या विधेयकाला विरोध केला. हा विषय देशाच्या अंतर्गत सुरक्षेशी संबंधित असून, त्यावर सविस्तर चर्चा व्हायला हवी, असं ते म्हणाले. तर, सरकारनं केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या प्रतिनिधीमंडळाशी सल्लामसलत न करताच हे विधेयक आणल्याचा आरोप समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांनी केला. पालघर जिल्ह्यातल्या तारापूर अणुऊर्जा केंद्राचं संवेदनशील स्वरूप लक्षात घेता, जिल्ह्यात २०० खाटांचं सुसज्ज रेडिएशन आपत्कालीन रुग्णालय' उभारण्यात यावं, अशी मागणी खासदार हेमंत विष्णू सवरा यांनी आज लोकसभेत केली. नियम ३७७ अंतर्गत, त्यांनी केंद्रीय गृह, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचं या महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधलं. संसदेचं कामकाज आज संस्थगित झालं.

<><><><><>

राज्यसभेत आज ‘आंध्र प्रदेश पुनर्रचना सुधारणा विधेयक, २०२६’ आवाजी मतदानानं मंजूर झालं. लोकसभेत हे विधेयक यापूर्वीच मंजूर झालं आहे. हे विधेयक अमरावतीला आंध्र प्रदेशाची एकमेव राजधानी म्हणून वैधानिक दर्जा प्रदान करेल. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी आंध्र प्रदेशच्या नवीन राजधानीनिमित्त आंध्र प्रदेशच्या जनतेचं अभिनंदन केलं आहे. जगभरातल्या तेलुगू समुदायासाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे असं गृह राज्यमंत्री नित्यानंद राय म्हणाले. हे विधेयक केवळ एका प्रशासकीय निर्णयापुरतं मर्यादित नसून, ते आंध्र प्रदेशातल्या पाच कोटींपेक्षा जास्त नागरिकांचा स्वाभिमान, विश्वास आणि लोकशाहीवरचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करेल, असं त्यांनी सभागृहात सांगितलं. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये हे विधेयक पारित होणं, ही ऐतिहासिक घटना असून, हा कायदा आंध्र प्रदेशच्या जनतेची सामूहिक इच्छा आणि आकांक्षा प्रतिबिंबित करत असल्याचं आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज २०२७ च्या जनगणनेसाठीची आपली माहिती दाखल केली. देशवासीयांनी आपली कौटुंबिक माहिती भरुन या जनगणनेमध्ये सामील होण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

भारतानं २०२५-२६ या आर्थिक वर्षात संरक्षण सामग्री उत्पादनांची ३८ हजार ४२४ कोटी रुपयांची विक्रमी निर्यात केली असून, गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यामध्ये १४ हजार ८०२ कोटी रुपये, म्हणजेच ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतकी वाढ झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. यात सार्वजनिक क्षेत्रातल्या उपक्रमांचा वाटा ५४ पूर्णांक ८४ शतांश टक्के, तर खासगी क्षेत्राचा वाटा ४५ पूर्णांक १६ शतांश टक्के आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या कामगिरीची प्रशंसा केली आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या मालदा जिल्ह्यात तीन महिला अधिकाऱ्यांसह सात न्यायिक अधिकाऱ्यांना ओलीस ठेवण्याच्या घटनेची आज सर्वोच्च न्यायालयानं गंभीर दखल घेतली. ही घटना अत्यंत निंदनीय असून या प्रकरणी न्यायालयानं राज्याचे गृह सचिव, पोलीस महासंचालक आणि इतर अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरण मागितलं आहे. निवडणूक प्रक्रियेचं निरीक्षण करून अधिकारी अहवाल तयार करत असताना ही घटना घडली. न्यायिक अधिकाऱ्यांना घाबरवून निवडणूक प्रक्रियेत अडथळा आणण्याचा हा प्रयत्न आहे, असं मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील पीठानं म्हटलं आहे. गरज पडल्यास सीबीआय किंवा एनआयएच्या चौकशीची मागणी करण्याची परवानगी न्यायालयानं निवडणूक आयोगाला दिली आहे.

<><><><><>

मुस्लीम समाजासाठी शिक्षण आणि नोकऱ्यांमधलं पाच टक्के आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर उत्तर देण्याचे निर्देश आज मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले. राज्याच्या सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं १७ फेब्रुवारी रोजी याविषयीचा शासन निर्णय जारी केला होता. हा निर्णय संविधानाचं उल्लंघन करणारा आणि मुस्लीम समाजाच्या हिताच्या विरोधात असल्याचा दावा करणारी याचिका एका वकिलाने दाखल केली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती आर. आय. छागला आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या प्रकरणी राज्य सरकारने पुढच्या तीन आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढची सुनावणी ४ मे रोजी होणार आहे.

<><><><><>

भारत आणि मोझांबिक यांच्यातली संयुक्त संरक्षण कार्यगटाची पाचवी बैठक आज मापुटो इथं झाली. या बैठकीत संरक्षण सहकार्य वाढवण्याबाबत चर्चेबरोबरच पुढच्या काळात संरक्षण क्षेत्रात काय करायचं याचा आराखडा ठरवण्यात आला. भारतीय प्रतिनिधीमंडळाचं नेतृत्व संरक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव अमिताभ प्रसाद यांनी केलं. या प्रतिनिधीमंडळात संरक्षण मंत्रालय, भारतीय सैन्यदल आणि तटरक्षक दलाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. लष्करी देवाणघेवाण वाढवणं, संयुक्त प्रशिक्षण, सागरी क्षेत्रातली जागरूकता, लष्करी सराव आणि संरक्षण उपकरणांच्या पुरवठा क्षेत्रातलं सहकार्य यावर भर देण्यात आला.

<><><><>

इस्त्रायलचा ताबा असलेल्या वेस्ट बँक भागातल्या पॅलेस्टिनींना मृत्युदंडाची शिक्षा देणारं नवीन विधेयक मंजूर करण्याच्या इस्त्रायलच्या निर्णयाचा अनेक इस्लामिक देशांनी निषेध केला आहे.  सौदी अरेबिया, इजिप्त, जॉर्डन, इंडोनेशिया, पाकिस्तान, कतार, तुर्की आणि संयुक्त अरब अमिरातीच्या परराष्ट्रमंत्र्यांनी संयुक्त निवेदनाद्वारे निषेध नोंदवला आहे.  यामुळे प्रादेशिक स्थैर्य धोक्यात येईल असा इशारा या देशांनी दिला आहे. इस्त्रायलच्या संसदेनं मंजूर केलेल्या या कायद्यानुसार, लष्करी न्यायालयानं प्राणघातक दहशतवादी हल्ले केल्याप्रकरणी दोषी ठरवल्या गेलेल्या पॅलेस्टिनींना मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल. संयुक्त राष्ट्र आणि युरोपियन युनियननं यावर टीका केली आहे, तर अमेरिकेनं मात्र इस्त्रायलच्या या निर्णयाला पाठिंबा दर्शवला आहे.

<><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरचे हल्ले सुरुच ठेवणार असल्याचं म्हटल्यानं आज जागतिक बाजारात आज कच्च्या तेलाच्या किंमतीत सात टक्क्यांनी वाढ झाली. कच्च्या तेलांच्या एका बॅरलची किंमत आज १०९ डॉलर १५ सेंटवर पोहोचली.

**<><><><><>**

जेरुसलेममधे इस्त्रायलनं सुरु केलेल्या हल्ल्यांच्या विरोधात आज अरब लिगची तातडीची बैठक झाली. ही स्थिती गंभीर असल्यानं ही तातडीची बैठक बोलावण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी बहारिन होतं.

**<><><><><>**

मंगोलियातल्या उलानबातर इथं आशियाई मुष्टियुद्ध स्पर्धेत आज भारताच्या आदित्य प्रताप यादवनं उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात यादवनं सौदी अरेबियाच्या मौसा अलहॉसॉ याचा ५-० असा सपशेल पराभव केला. उपांत्य फेरीत यादवचा सामना अब्दुलो मादामिनव्हशी होईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता इथल्या ईडन गार्डन्स मैदानावर कोलकाता नाईट रायडर्स आणि सनराईजर्स हैद्राबाद यांच्यात सामना सुरु. कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा सनराईझर्स हैदराबादच्या ८ षटकात १ बाद ११०धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**